अपील अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपील क्र.८२/२०२३

जा.क्र उआ (सा.प्र.)/ आस्था/८४०७दि. ०८/११/२०२३

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त , सामान्य प्रशासन विभाग, पुणे महानगरपालिका
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/८२/२०२३

प्रति,

श्री.अलोक भिंगारदिवे

श्री.आर.आर.कांबळे

C/o अलोक भिंगारदिवे प्लॉट नं.४५

एकता सोसा.गोल्फा क्लब रोड

येरवडा, पुणे-४११००६

यांस

---------------- अपिलार्थी

विरुद्ध

श्री.सर्व कनिष्ठ अभियंता (स्थापत्य, वाहतूक, यांत्रिक)

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

श्री.अलोक भिंगारदिवे व श्री.आर.आर.कांबळे, C/o अलोक भिंगारदिवे प्लॉट नं.४५, एकता सोसा.गोल्फा क्लब रोड, येरवडा, पुणे-४११००६ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी दि.३/१०/२०२३ रोजी (आ.क्र.१०९००, दि.०३/१०/२०२३) अन्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज प्राप्त झाला आहे.

अपिलार्थी यांचे मूळ अर्जातील माहिती बाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/५७३६ दि.२८/८/२०२३ व ६५७२, दि.१४/०९/२०२३ अन्वये अर्जास माहिती दिलेली आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| ०२/०८/२०२३ | ०२/०८/२०२३ | ०१/०९/२०२३ | २८/०८/२०२३<br>१४/९/२०२३ | ० |

अपिलार्थी यांनी "विहित मुदतीत माहिती प्राप्त नाही व दिशाभूल करणारी माहिती" असे अर्जात नमूद करुन दि.०३/१०/२०२३ रोजी (आ.क्र.१०९०० दि.०३/१०/२०२३) रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| ०३/१०/२०२३ | ०३/१०/२०२३ | १३/१०/२०२३ | होय | --- |

कलम ११(१) प्रमाणे अर्जदाराने मागितलेली माहिती त्यांना देण्याचा उद्देश असल्याबद्दल (त्रयस्थ पक्षकार) यांना कलम ११(१) मधील तरतुदीप्रमाणे कार्यालयाकडील जावक क्रमांक ५३२१ दि.१७/८/२०२३ रोजी कळविण्यात आले व ही माहिती अर्जदारास द्यावी किंवा नाही याबद्दल लेखी/अथवा समक्ष हजर राहून म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली. त्या, अनुषंगाने कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) आ.क्र.९७६८, ९७६७, ९७५६, ९७५५, ९७५४ व ईमेलद्वारे माहिती व कागदपत्रे न देण्याची लेखी युक्तिवाद केला आहे.

अपिल दिनांक १९/१०/२०२३ रोजी दुपारी ४.०० वा. सुनावणी आयोजित करण्यात आली होती. अपिलार्थी यांना दि.१८/१०/२०२३ सकाळी ११.३० वाजता दूरध्वनीवरुन सुनावणीस उपस्थित राहणेबाबत संपर्क साधला होता. दि.१९/१०/२०२३ रोजी सुनावणीस उपस्थित राहणे शक्य नसल्याचे नमूद केले. त्या अनुषंगाने दि.३१/१०/२०२३ रोजी अपिल सुनावणी आयोजित करण्यात आली आहे. अपिलार्थी श्री.अलोक भिंगारदिवे उपस्थित होते. अपिलार्थी श्री.आर.आर.कांबळे व जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी ,आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका हे अनुपस्थित होते.

## विवेचन

अपिलार्थी यांनी "विहित मुदतीत माहिती प्राप्त नाही व दिशाभूल करणारी माहिती" असे अपिल अर्जात नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग पुणे महानगरपालिका यांनी माहिती अधिकारात अर्जास जा.क्र.जमाअ/आस्था/५७३६ दि.२८/८/२०२३ व ६५७२, दि.१४/०९/२०२३ रोजीचे पत्रान्वये दिलेले उत्तर व अपिलार्थी यांचे लेखी म्हणणे पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दा | माहिती / उत्तर |
|---|---|---|
| १. | अस्थापना (उपआयुक्त – सा.प्र. / आस्थापना या विभागाकडे २००५-२३ दरम्यान – मनपा पुणे यांचे कडे सरळ सेवेने भरती झालेल्या – सर्वच क्षेत्रीय कार्यालयाचे, सर्वच विभागातील नियुक्त्या दिलेल्या – कनिष्ठ अभियंता (J.E.) यांच्या स्थापत्य व यांत्रीकी व इतर सर्व कनिष्ठ अभियंता पदविका व पदवी (diploma / degree) प्रमाणपत्रे व गुणपत्रकांच्या साक्षांकित प्रति – अत्यावशक. | **१) दि.२८/८/२०२३ रोजीचे उत्तर**<br>अभिलेख पाहता माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने माहिती उपलब्ध होताच आपणास कळविण्यात येईल.<br>**२) दि.१४/९/२०२३ रोजीचे उत्तर**<br>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ११(३) अंतर्गत माहिती प्रकट करण्याबाबत घेतलेला निर्णयास अधीन राहून (तदनंतर कागदपत्रांची संख्या कळविण्यात येईल) सोबत कलम ११(३) निर्णय प्रत |

२५८

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग पुणे महानगरपालिका यांनी पुढीलप्रमाणे निर्णय दिला आहे.

| |
|---|
| पुणे महानगरपालिकेस सादर करण्यात आलेली सर्व कागदपत्रे/अभिलेखे ही महानगरपालिकेच्या अभिलेखाचा भाग होतील व शासकीय नियमानुसार वापरण्यात येतील. आर्थिक तपशिला व्यतिरिक्त अन्य सर्व कागदपत्रे देणेस. |

माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी पाहता अपिलार्थी यांना माहितीच्या व्याख्येत उपलब्ध होणारीच माहिती देता येते. वास्तविक पाहता त्रयस्थ पक्षासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी माहिती देणेचा निर्णय घेतला असेल तर नेमक्या संख्येसहीत माहिती कळविणे आवश्यक होते. भविष्यात तशी दक्षता जन माहिती अधिकारी यांनी घ्यावी. कनिष्ठ अभियंता यांची वैयक्तिक तपशिल देणारी माहिती वगळता उर्वरीत माहिती, जी सार्वजनिक माहिती सदरात मोडते, ती देता येऊ शकेल असे अपिलाधिकारी यांनी नमूद केले. जन माहिती अधिकारी सुनावणीस अनुपस्थित असल्याने प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करण्यात यावी. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे, महानगरपालिका यांनी अपिलार्थी यांना सार्वजनिक स्वरुपाची माहिती उपलब्ध करुन देणेत यावी. त्यानुसार, सदर अपिल क्र.८२/२०२३ निकाली काढण्यात येत आहे.

6/11/23

(सचिन इथापे)
अपिलीय प्राधिकारी तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

---

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

सदर निकालाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रत/-
जन माहिती अधिकारी,
आस्थापना विभाग,
पुणे महानगरपालिका.